महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
Maharashtra Housing & Area Development Authority
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

===========================================================

जावक क्रमांक – १२४७ दिनांक :- ०१ एप्रिल, २०२२

प्रसिद्धीपत्रक

# महाराष्ट्रात म्हाडातर्फे येत्या वर्षभरात १५ हजार ७८१ सदनिका बांधण्याचे प्रस्तावित

**म्हाडाच्या सन २०२२-२३ साठी सादर १०,७६४.९९ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला प्राधिकरणाची मान्यता ; मुंबईत ४ हजार ६२३ सदनिकांची उभारणी करण्याचे प्रस्तावित**

मुंबई, दि. ०१ एप्रिल, २०२२ :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा (म्हाडा) सन २०२१-२२ चा सुधारित अर्थसंकल्प व सन २०२२-२०२३ चा अर्थसंकल्प प्राधिकरणास नुकताच सादर करण्यात आला. प्राधिकरणाच्या सन २०२२-२०२३ च्या १०७६४.९९ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पास व सन २०२१-२०२२ च्या सुधारित ७९७६.७४ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पास शासनाच्या मान्यतेच्या अधीन राहून प्राधिकरणाची नुकतीच मान्यता मिळाली आहे. सन २०२२-२०२३ च्या अर्थसंकल्पात २८८५.९२ कोटी रुपये तूट तर सन २०२१-२०२२ च्या सुधारित अर्थसंकल्पात १००९.०२ कोटी रुपयांची तूट दर्शविण्यात आली आहे.

सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात प्राधिकरणाच्या मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, कोंकण या प्रादेशिक मंडळांतर्फे एकूण १५ हजार ७८१ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी अर्थसंकल्पात ७०१९.३९ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

मुंबई मंडळासाठी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकात ३७३८.४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून मंडळातर्फे ४ हजार ६२३ सदनिकांची उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. मंडळातर्फे बीडीडी चाळींचा पुनर्विकास योजनेसाठी २१३२.३४ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. अँटॉप हिल वडाळा येथील गृहनिर्माण योजनेसाठी २९ कोटी रुपये, बॉम्बे डाईंग मिल वडाळा योजनेसाठी ६४ कोटी रुपये, कोपरी पवई येथील गृहनिर्माण योजनेसाठी १४५.५४ कोटी रुपये, मागाठाणे बोरिवली येथील योजनेसाठी ५० कोटी रुपये, खडकपाडा दिंडोशी येथील गृहनिर्माण योजनेसाठी १५ कोटी रुपये, पहाडी गोरेगाव येथील गृहनिर्माण योजनेसाठी २५० कोटी रुपयांची

तरतूद अर्थसंकल्पात केली आहे. सिद्धार्थ नगर (पत्राचाळ), गोरेगाव प्रकल्पासाठी ४३५ कोटी रुपये, धारावी पुनर्विकास प्रकल्प टप्पा ब साठी ९१.१८ कोटी रुपये, गृहनिर्माण भवन इमारतीची दुरुस्ती व पुनर्विकासासाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

कोंकण मंडळासाठी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात १९७१.५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून मंडळातर्फे ७ हजार ५९२ सदनिकांची उभारणी करण्याचे प्रस्तावित आहे. वर्तक नगर येथील पोलीस वसाहतीच्या पुनर्विकासासाठी अर्थसंकल्पात २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच मफतलाल (जि. ठाणे) येथील भूसंपादन व भूविकासासाठी १००२.५० कोटी रुपयांची तरतूद सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे.

पुणे मंडळासाठी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात ६६४.३२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून मंडळातर्फे १ हजार २५३ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. मंडळाने अर्थसंकल्पात पुणे जिल्ह्यातील धानोरी येथे भूसंपादन व भूविकासासाठी ३८० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

नागपूर मंडळासाठी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात ३८८.९७ कोटी रुपयांची तरतूद केली असून मंडळातर्फे १९५ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे. मंडळाने भूसंपादन व भूविकासासाठी १६९.९२ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

औरंगाबाद मंडळासाठी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात १३६.९० कोटी रुपयांची तरतूद केली असून मंडळातर्फे १७६२ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

नाशिक मंडळासाठी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात ३५.७२ कोटी रुपयांची तरतूद केली असून मंडळातर्फे २२० सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

अमरावती मंडळासाठी सन २०२२-२३ च्या अर्थसंकल्पात ७५.५७ कोटी रुपयांची तरतूद केली असून मंडळातर्फे १३६ सदनिकांचे बांधकाम करण्याचे प्रस्तावित आहे.

मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्राधिकरण